# काळा कावळा

प्रकाशित:


**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ



© पुनरारंभ



website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# काळा कावळा

उशीराच्या जागरणामुळे सकाळी ६ वाजता जाग आली ती, घराच्या छतावर बसलेल्या कावळयाच्या कर्कश काव ऽऽ काव ऽऽ नेच. सुरवातील त्याचे ओरडणे न आवडल्यामुळे त्याला हुसकावून लावले व अंथरूणावर जाउन पडलो पण पाच दहा मिनिटांनी पुन्हा परतून त्याने आपले स्थान ग्रहण केले व काव ऽऽ काव ऽऽ चा जयघोष सुरू केला. पुनश्च एकदा त्याला हुसकावून मी अंथरूणावर येऊन झोपलो व झोपण्याचा प्रयत्न केला. पण कावळा तो कावळाच सहजा सहजी जाईल तो कावळा कसला. मी हुसकावणार तो परतून येणार असा आमच्यात कळत न कळत न संपणारा खेळच सुरू झाला.

माझी व कावळयाची चाललेली गंमत पाहून पत्नी म्हणाली, “अहो, आज आपल्याकडे कुणीतरी पाहुणे येणार असतील म्हणून कावळा दारात ओरडतोय. पाहुणे येणार असले म्हणजे कावळा ओरडतो असे माझी आई म्हणते. “छे! काहीतरीच काय सांगते” असे म्हणत मी तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. “अहो पण आज गावात नातेवाईकांकडे विवाह कार्य असल्यामुळे पाहुणे येण्याची शक्यता नाकारता येत नाही” ती पुनश्च म्हणाली. तिच्या या बोलण्यावर काहीसे सहमत होत, कावळयास हुसकावण्याचा नाद सोडला व उठून दिनचर्येस लागलो. तरी पण कावळा आपले स्थान सोडण्यास तयार नव्हता व आपला काव ऽऽ काव ऽऽ चा जयघोष चालूच होता. अखेर मी हरलो व कावळा जिंकला!

प्रार्तर्विधी आवरून खाली येतो न येतो तोच डोक्यात लाल पागोटे, कपाळी अष्टगंध व काळा बुक्का त्यावर रेखीव गंध, कानांच्या पाळयांवर तसेच गळयावर पांढ–या रंगाचा गोल चंदनाचा टिळा, पांढरा शुभ्र नेहरू शर्ट, खांद्यावर पांघरलेली लाल रंगाची शाल, एका विशिष्ट पध्दतीने व्यवस्थितपणे चापून चोपून नेसलेले पांढरे शुभ्र एक टांगी धोतर, उजव्या हातात हात वर करून हातातील छोटेसे डमरू खूबीने तालबध्द वाजवित एक तीस–पस्तीस वर्षीय मध्यम शरीर यष्टीचा पिंगळा नामक याचक दारात दत्त म्हणून हजर झाला. मुखाने भुपाळी व हरी भक्तीचे गीत गात होता.

आज गुरूवार त्यास दत्ताचा अवतार समजून शिवाय रामप्रहरी दारात आलेल्या याचकास विन्मुख पाठविणे उचित नाही असा सदविचार करून दान दिले. बोट दिले असता हात धरत माझी इच्छा नसतांना तो पोपटा सारखे न अडखळता बोलू लागला. काही खरे, काही खोटे, काही तर्क वितर्क लावीत माझे भविष्य वर्तवू लागला.

सुरवातीला त्याचे नवखे बोल मला आवडले व मी ऐकत राहिलो. तो सांगू लागला, "तुमच्या नावाचा पंढरपूर दरबारी डंका वाजविन महाराज. तुमचा स्वभाव भोळा आहे महाराज त्याचा फायदा मित्र मंडळी व नातेवाईक घेत राहिले महाराज. आपण मोठया दिलाचे महाराज. दारी आलेल्या याचकास विन्मुख पाठवित नाही महाराज. हिच आपली पुण्याई. कुल दैवत व वाडवडिलांच्या आशिर्व ादा मुळे आपले कोणी वाईट करू शकत नाही महाराज. घरची लक्ष्मी तुमचेवर सदैव प्रसन्न आहे महाराज. तिच्या सहकार्याने आजपावेतो आपण अपयश मागे टाकित यश मिळवित आलात महाराज. तुमास्नी हि-या सारखे दोन मुलगे आहेत महाराज. तुम्ही बालवयात कष्ट उपसलेत. तुमचे सत्कर्म कुलदेवतेचा व वाडवडिलांच्या आशिर्वादामुळे त्याची मधूर फळे आज चाखता आहात महाराज.

मध्येच घराकडे बोट दाखवित "पण महाराज, या तुमच्या महालाला काळया कावळयाची नजर झालीय महाराज. छतावर बसून काळा कावळा काव ऽऽ काव ऽऽ करतोय महाराज. आपल्या सुखात अडथळा आणु इच्छितोय महाराज" वगैरे वगैरे.

आतापर्यंत प्रत्येक वाक्याच्या अखेरीस महाराज शब्द उच्चारून मला महाराजाची पदवी प्रदान करीत होता. त्याचे सर्व बोलणे ऐकून मी त्याचे हातावर अकरा रूपये देत त्याला कटविण्याचा प्रयत्न केला पण त्याने आपले बोलणे चालू ठेवत म्हणाला.

"तुमची हरकत नसेल तर या कावळयाचा कायमचा बंदोबस्त करिन महाराज."

त्याच्या बोलण्यावर विश्वास न ठेवता त्याला निरोप दिला .

पिंगळा गेल्यावर छतावर बसून कावळयाच्या ओरडण्या बद्दल केलेले वक्तव्य मनास रूचले नाही . त्याच्या बोलण्याचे मी चिंतन केले .

सहजपणे माझी नजर रस्त्यावर गेली . पाहतो तर काय रस्त्याच्या कडेला एक मोठा उंदीर मरून पडला होता . ते कावळयाचे खाद्य होते व ते मिळविण्यासाठी तो काव ऽऽकाव ऽऽचा घोष करित होता . सर्वसाधारणपणे गृह लक्ष्मी सदैव सहकार्य करित असतेच . आजकालचे सर्वांचे जिवन जगणे खडतरच झाले आहे . बहुतेकांनी आपल्या आयुष्यात कष्ट करूनच सुख मिळविलेले असते . दोन मुलांबद्दल बोलायचे झाल्यास, दारावरील पाटीवर माझ्या नावासमवेत दोन्ही मुलांची नावे असल्यामुळे दोन पुत्र असल्याचे भाकित केले . यात नविन विशेष असे वाटत नाही . परंतु यामुळे थोडीशी करमणुक झाली शिवाय हसू आले .

यातील करमणुकीचा भाग सोडला तर कावळया चे ओरडणे शुभ समजावे की अशुभ असा संभ्रम पडला . शुभ म्हणावे, तर पाहुणे घरी येणार व आपल्या भारतीय संस्कृतिप्रमाणे अतिथी देवो भव! या सुसंस्कारा प्रमाणे त्याला परमेश्वर समजून परमेश्वराची सेवा घडणार . अशुभ म्हणावे, तर घरावर अरिष्ट येणार असा गैरसमज . याला अंध श्रध्दा म्हणता येईल ; मृत्युनंतरच्या क्रिया कर्माला आणि पितृपक्षात पितरांना जेउ घालतांना याच काळया कावळयाची आपण चातका प्रमाणे वाट पहात असतो ना! मग याच्या ओरडण्याला अशुभ का समजावे बरं ! म्हणतात ना कावळयाच्या शापाने गाय मरत नाही .

असो यावरून पण एवढे मात्र बाकी खरे की, “दुनिया झुकती है झुकाने वाला चाहिए” .